महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN No.U40109MH2005SGC153646)

माहितीचा अधिकार

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN NO-U40109MH2005SGC153646)
(GST NO-27AAECM2936N1Z2)

अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ कार्यालय,
''प्रकाश सरिता'' प्रशासकीय इमारत, सी - विंग, दुसरा माळा,
२२० के. व्ही उपकेंद्र परिसर, मोर्शी रोड, अमरावती -४४४ ६०३
फोन नं. ०७२१ - २९७०२८१/फॅक्स नं. ०७२१ -२६६९१६७
इमेल आयडी -se1100@mahatransco.in वेब साईट -www.mahatransco.in

क्र.मराविपाकं/अ.अ./अउदा/संवसु/मंडळ/अम/मासं/०४९१ दिनांक:- २४.०६.२०२५

## शिकाऊ उमेदवार कायदा १९६१, अंतर्गत सत्र २०२४-२५ करीता निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती तिसरी निवड यादी

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री व्यवसायात उत्तीर्ण पात्र उमेदवारांकडून अउदा संवसु विभाग, अमरावती अंतर्गत उपकेंद्र व उपविभागाकरीता एकूण २५ जागांकरीता शिकाऊ उमेदवारीकरीता एक वर्ष कालावधी करीता (online) ऑनलाईन अर्ज तथा (offline) ऑफलाईन अर्ज मागविण्यात आले होते. (online) ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतीम दि. ३१.१२.२०२४ तसेच स्वहस्ते / पोस्टाने अर्ज सादर करण्याची अंतीम दि. १०.०१.२०२५ होती. पहिली निवड यादी महापारेषण कंपनीच्या वेबसाईटवर दि. २८.०३.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली, तसेच पहिल्या यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेलद्वारे व मोबाईलद्वारे संपर्क करून कागदपत्र पडताळणी करीता दि. ०७.०४.२०२५ पर्यत प्रवर्गनिहाय एकूण २५ उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करीता बोलावण्यात आले होते, परंतु त्यापैकी १३ उमेदवार कागदपत्र पडताळणीकरीता हजर झाले असून उर्वरीत प्रवर्ग निहाय एकुण १२ शिकाऊ उमेदवार यांची दुसरी निवड यादी तयार करण्यात आली होती, सदर यादी महापारेषण कंपनीच्या वेबसाईटवर दि. ०६.०५.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली, तसेच निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेलद्वारे व मोबाईलद्वारे संपर्क करुन कागदपत्र पडताळणी करीता दि. १९.०५.२०२५ पर्यत बोलावण्यात आले होते. परंतु त्यापैकी ०५ उमेदवार कागदपत्रे पडताळणीकरीता हजर झाले असून उर्वरीत प्रवर्ग निहाय एकुण ०७ शिकाऊ उमेदवार यांची तिसरी निवड यादी तयार करण्यात आली आहे.

२. वैध अर्ज असलेल्या पात्र उमेदवारांची त्यांच्या एस.एस.सी. तसेच आय.टी.आय. (विजतंत्री) एकत्रित टक्केवारीच्या सरासरीच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली आहे. उमेदवारांच्या अर्जामध्ये असलेल्या माहितीनुसार प्रवर्गनिहाय सामाजिक आरक्षणाच्या आधारे गुणवत्तेनुसार तात्पुरती तिसरी निवड यादी तयार करण्यात आलेली आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांची एकत्रित गुणांची टक्केवारी समान आहे, अशा उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून वयाच्या ज्येष्ठतेनुसार क्रमवारी लावण्यात आली.

४. तात्पुरत्या तिस-या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारीकरीता उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. तात्पूरती निवड यादी ही उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, व ईतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून आहे. त्यामूळे जर उमेदवार शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होण्यासाठीची पात्रता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी /निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरत्या तिस-या यादीमध्ये निवड झालेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्र पडताळणी च्या वेळेस शैक्षणिक पात्रतेसंबंधी गुणपत्रिका /प्रमाणपत्रे, सामाजिक आरक्षणाकरीता ज्या प्रवर्गातून अर्ज सादर केलेला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, ज्या प्रवर्गाकरीता प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र) आवश्यक आहे, त्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेअर) (चालु वर्षात वैध असलेले) प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांना ई.डब्लू. एस. प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, ईत्यादी मुळ प्रमाणपत्रे व सर्व कागदपत्रांची साक्षांकीत झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. जर उमेदवार कागदपत्र पडताळणीच्या वेळेस वरीलपैकी मुळ प्रमाणपत्रे दर्शविण्यात असमर्थ ठरल्यास किंवा मुळ प्रमाणपत्र व अर्जासह जोडलेल्या प्रमाणपत्रांमध्ये तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरती तिस-या यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांपैकी कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्याने, कागदपत्र पडताळणी करीता विहीत मुदतीत हजर न झाल्याने, अथवा कागदपत्र पडताळणीत पात्र ठरूनही दिलेल्या ठिकाणी विहीत मुदतीत रूजू न झाल्याने रिक्त असलेल्या जागांकरीता गुणवत्ता यादीतील क्रमवारीने प्रतिक्षा यादी आपोआपच कार्यान्वित होऊन खुल्या तथा राखीव जागांकरीता प्रवर्गनिहाय उमेदवारांची निवड लावण्याचे अधिकार अउदा संवसु मंडळ, अमरावती राखून ठेवत आहे.

७. तात्पुरती तिसरी निवड तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार अउदा संवसु मंडळ, अमरावती राखून ठेवत आहे.

८. निवड न झालेल्या उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचे फोन, ईमेल किंवा पत्रव्यवहार अउदा संवसु विभाग, अमरावती कार्यालयाकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही ईमेल किंवा पत्रव्यवहाराची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९. तिस-या निवड यादीतील उमेदवारांनी दि.०२.०७.२०२५ पर्यंत ''**कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, महापारेषण, ''प्रकाश सरिता'' प्रशासकीय इमारत, बी - विंग, तळ मजला, २२० के. व्ही उपकेंद्र परिसर, मोर्शी रोड, अमरावती - ४४४ ६०३** '' या पत्त्यावर कार्यालयीन दिवशी (शनिवार/रविवार वगळून), कार्यालयीन वेळेत मुददा क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुळ प्रमाणपत्रे (१ संच साक्षांकीत झेरॉक्स प्रतीसह) पडताळणीकरीता हजर राहावे. दि. ०२.०७.२०२५ नंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

१०. कागदपत्र पडताळणी करीता येणा-या उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवासखर्च किंवा ईतर खर्च दिल्या जाणार नाही. सर्व उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहावे लागेल.

## खुला प्रवर्ग तिसरी निवड यादी :-

| Sr.No. | General Merit List No. | Name of Candidate | Category | Marks (%) | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 29 | Akshay Prkashrao Umale | OBC | 89.79 | Selection Against OPEN |
| 2 | 30 | Gauri Panditrao Rautkar | OBC | 89.78 | Selection Against OPEN |
| 3 | 31 | Bhavesh Jitendra Rase | OBC | 89.69 | Selection Against OPEN |

इमाव प्रवर्ग तिसरी निवड यादी :-

| Sr.No. | General Merit List No. | Name of Candidate | Category | Marks (%) | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 32 | Om Arvind Charhate | OBC | 89.48 | |
| 2 | 37 | Vedant Devendra Murhekar | OBC | 88.99 | |
| 3 | 38 | Akash Vinod Bijwe | OBC | 88.89 | |

साशैमाप्र प्रवर्ग तिसरी निवड यादी :-

| Sr.No. | General Merit List No. | Name of Candidate | Category | Marks (%) | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | -- | Vacant | SEBC | -- | -- |

(प्रमोद रा.पखाले )
अधिक्षक अभियंता,
अउदा संवसु मंडळ, अमरावती.